PR099

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. अभिजीत कुलकर्णी**
**संचालक**

**संदर्भ क्र.-वि.वि.मं. २०२३-२४/१२४** **दिनांक :** २१ Sep २०२३

प्रति ,
मा.प्राचार्य,
जयहिंद कॉम्प्रेहेन्सिव्ह एज्युकेशनल इन्स्टिट्युट नारायणगांव
जयहिंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कुरण पत्ता: कुरण ता.:
जुन्नर जि: पुणे पिनकोड: 410511

**विषय : कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना मान्यता.**

महोदय/महोदया,
आपल्या प्रस्तावास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करिता कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबवण्याबाबत विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणास आपण पाठविलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. या योजनेबाबतच्या सर्व सुधारित नियम व अटींचे पालन करून वरील योजना आपल्या महाविद्यालात ऑगस्ट २०२३ ते माहे फेब्रुवारी २०२४ ह्या दरम्यानच्या कालावधीत राबविणे अपरिहार्य आहे.

1. योजनेत सहभागी प्रत्येक व सर्व विद्यार्थ्यांना; त्यांनी केलेल्या प्रत्यक्ष कामाचा मोबदला (प्रति विद्यार्थी प्रति तास रुपये ४५/- याप्रमाणे एका दिवशी जास्तीत-जास्त ३ तासापर्यंतच) काम केलेल्या प्रत्येक महिन्यानंतर त्वरित संबंधित प्रत्येक / सर्व विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्येच लगतच्या पुढील महिन्यात १२ तारखेपर्यत जमा करणे अनिवार्य आहे.
2. या योजनेच्या नियमावलीनुसार प्रत्येक महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थी विकास मंडळाचे राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये माननीय प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने स्वतंत्र खाते असणे आवश्यक आहे. (या संयुक्त खात्याचा उपयोग फक्त विद्यार्थी विकास मंडळाकडूनच मंजूर झालेल्या या व इतर सर्व योजनांच्या अनुदानाचे वितरण व खर्च करणेसाठी करावा.)
3. विद्यार्थ्यांचे मानधन वितरणाची संपूर्ण प्रक्रिया हि " महाविद्यालय / परिसंस्थेने या योजनेसाठी निश्चित केलेल्या राष्ट्रीयीकृत बँक खात्यामधून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये " याच पद्धतीने असणे अनिवार्य आहे. या विहित पद्धती शिवाय इतर कोणत्याहि प्रकारे/ पद्धतीने विद्यार्थ्यांचे मानधन वितरण अनुज्ञेय नसून ते अग्राह्य मानले जाईल व संबंधीत लेखे अस्विकृत करण्यात येतील.
4. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या नियमावलीनुसार या योजेतील सहभागी विद्यार्थ्यांना त्यांचे मानधन प्रत्येक महिन्याच्या समाप्तीनंतर तात्काळ लगतच्या महिन्याच्या १२ तारखेपर्यत त्यांच्या बँक खात्यात जमा करणे अनिवार्य आहे. असे न झाल्यास त्या त्या महिन्याचे अदा केलेले मानधन लेखापरीक्षणातून वगळले जाईल आणि विद्यापीठाकडून अशा विलंब केलेल्या मानधनाचे अनुदान मिळणार नाही.
5. विद्यार्थी विकास मंडळाच्या निर्देशानुसार सदर योजनेत सहभागी विद्यार्थ्यांना एकूण जास्तीत जास्त तीन तासापर्यंतच काम देता येईल.
6. सदर योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व व एकूण स्वरूप लक्षात येण्यासाठी आळीपाळीने कार्यालयीन व क्षेत्रीय कामकाज देण्यात यावे.
7. योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधी व सार्वजनिक सुट्या सोडून काम देण्यात यावे.
8. सदर योजना आपल्या महाविद्यालयात फेब्रुवारी २०२४ अखेर या दरम्यानच्या कालावधीतच राबविणे अनुज्ञेय आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी योजनेच्या प्रचलित सर्व नियम व अटींचे कोणत्याही स्तरावर उल्लंघन झाल्यास या योजनेची मान्यता तत्प्रभावी रद्दबातल होऊन त्याबाबतची प्रशासकीय/आर्थिक सुरक्षात्मक स्वरूपाची सर्व जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्थेची असेल. विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणाच्या नियमावलीत न राहता उपक्रमासंबंधी झालेल्या कार्यवाहीचा व वार्षिक लेख्यांचा वार्षिक लेखा परीक्षणाच्यावेळी विचार केला जाणार नाही. कळावे, हि विनंती.

आपला,

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

**टिप: १).योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये काही बदल झाल्यास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.**

**२).मागील शैक्षणिक वर्षात या योजनेअंतर्गत आपणास विद्यापीठाकडून अनुदान प्राप्त झाले असल्यास आणि आपल्या महाविद्यालयाने या प्राधिकरणास आपल्या महाविद्यालयाच्या बँक खात्याबाबत माहिती पाठविलेली असेल तर 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजनेसाठीची प्रथम हफ्त्याची रक्कम रु. १६८००/- 'RTGS' द्वारे आपल्या महाविद्यालयाच्या बँक खात्यात जमा केली जाईल.**

| Name on Account | Account No | Bank Name | Branch Name | IFSC Code |
|---|---|---|---|---|
| Principal,Jaihind College of Engineering Kuran | 16561131001508 | Panjab National Bank | NARAYANGAON | PUNB0165610 |